## १४. विनाअनुदानित महाविद्यालयातील सेवा पेन्शनसाठी ग्राह्य धरण्याबाबत आदेश

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग

शासन निर्णय क्रमांक : एनजीसी - १७९३/२५६०/विशि-४

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई- ४०० ०३२

दिनांक : २२ नोव्हेंबर, १९९३

पहावे : १) शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक एनजीसी - १२८३/(८६५)/ विशि-४, दिनांक २१ जुलै, १९८३

२) शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. एनजीसी - २०८८/(१६५२)/ विशि-२ अ, दिनांक ४ जानेवारी, १९८९

**शासन निर्णय :** कृषीतर विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित मान्यताप्राप्त व अनुदानित अशासकीय महाविद्यालयांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना निवृत्तिवेतन शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. एनजीसी - १२९३/(८६५)/विशि-४, दिनांक २१ जुलै, १९८३ अन्वये लागू करण्यात आलेला आहे. या शासन निर्णयातील परिच्छेद -२ (डी) च्या तरतुदीनुसार मान्यताप्राप्त व अनुदानित कला, विज्ञान, वाणिज्य व शिक्षणशास्त्र महाविद्यालये; कृषीतर विद्यापीठे, मान्यताप्राप्त व अनुदानित अशासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा यांमधील सेवा विचारात घेतली जाते. मान्यताप्राप्त विनाअनुदानित अशासकीय महाविद्यालयात केलेली सेवा मात्र निवृत्तिवेतनविषयक लाभांसाठी ग्राह्य धरण्याबाबतची तरतूद उपरोक्त आदेशात नाही.

२) शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग, क्रमांक : एनजीसी - २०८८/(१६५२)/ विशि-२ अ, दिनांक ४ जानेवारी, १९८९ च्या आदेशानुसार मान्यताप्राप्त व विनाअनुदानित अशासकीय महाविद्यालयांना टप्प्याटप्प्याने अनुदान तत्त्वावर आणण्याचे धोरण शासनाने अवलंबिले आहे. त्यानुसार गेल्या काही वर्षांत विनाअनुदानित तत्त्वावर चालणाऱ्या महाविद्यालयांना टप्प्याटप्प्याने अनुदान तत्त्वावर आणण्यात येत आहे. या अनुदान सूत्रानुसार महाविद्यालयांना शासनमान्यता देण्यात आल्यानंतर पहिल्या तीन वर्षांसाठी कोणतेही अनुदान मंजूर करण्यात येत नाही. त्यानंतर ४ थ्या, ५ व्या व ६ व्या वर्षासाठी अनुक्रमे २५ टक्के, ५० टक्के व ७५ टक्के अनुदान देण्यात येते व सातव्या वर्षापासून या महाविद्यालयांना १०० टक्के अनुदान मिळते. सध्याच्या धोरणानुसार अशी महाविद्यालये ज्या दिनांकापासून १०० टक्के अनुदान मिळण्यास पात्र ठरतात, त्या दिनांकापासूनची त्यामधील कर्मचाऱ्यांची सेवा निवृत्तिवेतनासाठी ग्राह्य धरण्यात येते. ज्या कालावधीसाठी ही महाविद्यालये पूर्णत: किंवा अंशत: विनाअनुदानित होती, त्या कालावधीची सेवा निवृत्तिवेतनविषयक लाभांसाठी ग्राह्य धरण्याबाबतचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

३) शासन आता असा निर्णय घेत आहे की, कृषीतर विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित अशासकीय मान्यताप्राप्त अनुदानित महाविद्यालये यांमधून सेवानिवृत्त होणाऱ्या व ज्यास सेवानिवृत्तिवेतन योजना लागू आहे, अशा कर्मचाऱ्यास पूर्वी त्याच किंवा दुसऱ्या महाविद्यालयात ती जेव्हा अंशत: किंवा पूर्णत: विनाअनुदानित होती, त्या कालावधीत केलेली सेवा खालील अटींच्या अधीन राहून सेवानिवृत्तिवेतनासाठी अर्हताकारी सेवा म्हणून ग्राह्य धरण्यात यावी :

अ) ज्या विनाअनुदानित महाविद्यालयातील सेवा वरीलप्रमाणे निवृत्तिवेतनासाठी ग्राह्य

धरावयाची आहे, ते महाविद्यालय संबंधित कर्मचाऱ्यांच्या निवृत्तीच्या दिनांकाला पूर्णत: अनुदानित असले पाहिजे.

ब) संबंधित मान्यताप्राप्त, विनाअनुदानित अशासकीय महाविद्यालयास शिक्षण विभागाच्या अथवा विद्यापीठाच्या सक्षम प्राधिकाऱ्याने मान्यता प्रदान केलेली असावी.

क) जर एखाद्या शिक्षकाने मान्यताप्राप्त विनाअनुदानित अशासकीय महाविद्यालयात सेवा केली असेल व ती सेवा जर वर नमूद केलेल्या विनाअनुदानित महाविद्यालयातील असेल तर त्या शिक्षकाने त्या सेवेच्या अंशदायी भविष्यनिर्वाह निधीच्या व्यवस्थापनाच्या हिश्श्याची रक्कम व्याजासहित शासकीय कोषागारात जमा करणे आवश्यक राहील. तथापि, जेथे संबंधित महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाने, त्या वेळी अस्तित्वात असलेल्या नियमानुसार अंशदायी भविष्यनिर्वाह निधीचे खाते सुरू केलेले नसेल, अशा प्रकरणी संबंधित शिक्षकाने ते ज्या दिनांकापासून अंशदायी भविष्यनिर्वाह निधीची वर्गणी भरण्यास पात्र ठरले, त्या दिनांकापासून संबंधित कालावधीची भविष्यनिर्वाह अंशदानाची रक्कम जमा केली पाहिजे. तथापि, या रकमेवर व्याज आकारले जाणार नाही. जर व्यवस्थापनाच्या हिश्श्याची रक्कम त्या शिक्षकास दिली गेली असेल तर संबंधित शिक्षकाने त्याचे अंशदायी भविष्यनिर्वाह निधी खाते ज्या दिवशी पुन्हा सुरू करण्यात आले होते, त्या दिनांकापासून व्यवस्थापनाची हिश्श्याची रक्कम शासकीय कोषागारात जमा करण्याच्या दिनांकपर्यंतच्या कालावधीचे प्रतिवर्षी (३ $\frac{१}{२}$ टक्के) साडेतीन टक्के या दराने सदर रकमेवरील व्याज देणे आवश्यक राहील.

ड) जर एखाद्या कर्मचाऱ्याने मान्यताप्राप्त, विनाअनुदानित अशासकीय महाविद्यालयात सेवा केली असेल व ती सेवा वर नमूद केलेल्या विनाअनुदानित महाविद्यालयातील सेवा असेल तर त्या शिक्षकांना संबंधित मान्यताप्राप्त विनाअनुदानित अशासकीय महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाने त्यांच्या अंशदायी भविष्यनिर्वाह निधीच्या खात्यात जमा केलेली रक्कम त्यावरील व्याजासहित शासकीय कोषागारात जमा करणे आवश्यक राहील.

४) शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी अशा प्रकारची वस्तुस्थिती तपासून संबंधित मान्यताप्राप्त, विनाअनुदानित अशासकीय महाविद्यालयांची पडताळणी करून योग्य तो निर्णय घ्यावा.

५) हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ३६३/९३/सेवा ४, दि. १०-११-९३ अन्वये निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-

**(मा. ना. कांबळे)**

अवर सचिव, महाराष्ट्र शासन